जा.क्र./नसका/स्थायी/सिआर-01/2021
दिनांकः- 15.04.2021

## <u>स्थायी समितीच्या सभेची सूचना</u>

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड चे प्रकरण-2 मधील नियम क्र. 3 (अ) अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूचि ड चे प्रकरण दोन मधील नियम क्र.3 (अ) (ब) अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा <u>दिनांक 16.04.2021 रोजी दुपारी 03.00</u> वाजता **ONLINE व्दारे आयोजीत केली आहे.**

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी **ONLINE** सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे.

**स्वाक्षरीत/-**
**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**( गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ )**
**सभापती,**
**स्थायी समिती,** नांवाशमनपा, नांदेड.

**प्रति,**
**श्री / श्रीमती -----------------------------------------**
**सदस्य / सदस्या, स्थायी समिती,**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**विषय क्रं.** 01

**विषय :-** <u>रमाई आवास योजनेसाठी प्रकल्प सल्लागार यांना मुदतवाढ देणे बाबत</u>

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीमध्ये राज्य शासनाचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या आखत्यारित रमाई आवास योजनेचा अमलबजावणी करण्यात येत आहे. सदर योजने अंतर्गत आजपर्यंत 4677 घरकुल मंजुर असून आजपर्यंत 6620 लाभार्थीयांची यादीस गृहनिर्माण समितीने मान्यता दिली आहे. ज्यापैकी 1943 घरकुलांची शासनाकडून मान्यता येणे बाकी आहे.

सदर योजनेची कामे जसे लाभार्थीयांचे सर्वेक्षण करणे, देयक सादर करणे, सर्व झोनची एकत्रित माहिती संकलन करुन शासनास सादर करणे, इत्यादीसाठी प्रकल्प सलगार आवश्यक आहे ज्यामुळे लाभार्थीची कामे वेळेमध्ये पूर्ण होण्यास मदत होत आहे. रमाई आवास योजना शासन निर्णय मध्ये प्रकल्प सल्लागार व इतर खर्चासाठी 5% निधीची तरतूद आहे. त्यानुसार प्रकल्प सल्लागारासाठी सर्वेक्षण करुन यादी सादर करणेसाठी 0.86% (घरकुल किमंतीच्या) व प्रकल्प व्यवस्थापण करणेसाठी 0.99% (घरकुल किमंतीच्या) दर यापुर्वी मंजुर असून दरवाढ न करता त्याच दराने पुढील योजना संपेपर्यंत मुदतवाढ देणेसाठी प्रस्ताव मनपा स्थायी समितीसमोर मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं. 02**

**विषय** :- <u>डॉ. शंकररावचव्हाण शासकीय वैद्यकीय रुग्णालय विष्णुपूरी नांदेड येथे कोरोना प्रादुर्भावाच्या अनुषंगाने दुसरे मलशुध्दीकरण केंद्र कार्यन्वीत करणे बाबत</u>

डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विष्णुपुरी नांदेड येथील नांदेड जिल्हयालगतचे जिल्हे तसेच आंध्रप्रदेश, तेलंगना व कर्नाटक येथील रुगण मोठयाप्रमाणात उपचारासाठी येत असतात. तसेच या रुग्णालय परिसरामध्ये गंभीर कोरोना रुग्णासाठी कोविड सेंटर कार्यान्वीत करण्यात आले आहेत. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या त्रुटीची पुर्तता करण्याकरीता रुग्णालयास मलशुध्दीकरण केंद्र कार्यान्वीत करणे अत्यंत आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने सदरील 150 के.एल.डी. क्षमतेचे मलशुध्दीकरण केंद्र कार्यान्वीत करण्याकरीता महानगरपालिकेने सादर केलेल्या अंदाजपत्रकास मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिति यांनी जिल्हा वार्षीक योजना (सर्वसाधारण) सन 2020-21 मधील कोविड-19 च्या अनुषंगाने रुपये 79.32 लक्ष एवढया खर्चास दिनांक 08.02.2021 रोजीच्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. तसेच सदरील मलशुध्दीकरण केंद्र उभारणीसंदर्भात मा. जिल्हाधिकारी नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली असता सदरील कामाबाबतची सर्व कार्यवाही आयुक्त, महानगरपालिका यांनी पूर्ण करावी असे बैठकीत निर्देशीत करण्यात आले होते.

त्याअनुषंगाने सदरील निविदा प्रक्रिया पूर्ण करुन घेण्यासाठी दिनांक 22.02.2021 रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली. सदरील निविदा प्रक्रियेत एकूण 02 निविदाधारकांनी सहभाग नोंदविलेला असुन तात्रिक अर्हता तपासली असता दोन्ही निविदाधारक पात्र आहेत. सदरील निविदा प्रक्रियेचा पुढील भाग म्हणून प्राप्त दरा उघडण्यात आले असता त्यांचा दरासंदर्भातील तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाधारक | अंदाजपत्रकीय किमंत | कंत्राटदाराने भरलेले दर | % जास्त | % कमी |
|---|---|---|---|---|---|
| 01 | आयडीयल सिस्टीम पुणे | 4984850 | 4983354 | -- | 0.03% |
| 02 | शिवशक्ती इंटरप्रायझेस पुणे | 4984850 | 5034698 | 1.00% | -- |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त 02 निविदाधारका पैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक **मे. आयडीयल सिस्टीम पुणे** यांचे असून ते अंदाजपत्रक दरापेक्षा 0.03% कमी दराने प्राप्त झाली आहे. सदरील कामावर मंजुर निविदे नुसार लागणारा खर्च सालसन 2020-21 या आर्थीक वर्षात जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) या लेखा शिर्षकातून करण्यात येईल. तरी, **आयडीयल सिस्टीम पुणे** या कमी दराच्या निविदाधारकाबरोबर संविदा करणेच्या मान्यतेकरीता प्रस्ताव मनपा स्थायी समितीच्या पटलावर सादर.

**स्वाक्षरीत/-**
**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**( गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ )**
**सभापती,**
**स्थायी समिती,** नांवाशमनपा, नांदेड.